नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

| वर्ष - ४ रे<br>Year - 4rd | अंक - २२<br>Issue - 22 | वार - मंगळवार दि. १६ जून २०२६<br>Blow- Tuesday Date 16 JUNE 2026 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

# महाराष्ट्रासह १६ राज्यांत पावसाची प्रतीक्षा

## देशात पावसाची ६४ टक्के तूट; सॅटेलाईट इमेजमधून देशातील मोसमी ढग अक्षरशः गायब!




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारतात नैऋत्य मोसमी पावसाचा वेग मंदावला आहे. सोमवार, १५ जून रोजीच्या उपग्रह प्रतिमांमध्ये देशाच्या मोठ्या भागावर मोसमी ढगांचा अभाव दिसून आला. हवामान विभागाच्या मते, ४ ते १५ जून दरम्यान देशात सरासरी ५३.७ मिमी पाऊस पडायला हवा होता, परंतु केवळ १९.२ मिमी पाऊस झाला, ज्यामुळे पावसाची ६४ टक्के तूट निर्माण झाली आहे. मोसमी पावसाच्या मंदावण्यामुळे राजस्थान, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, बिहार, उत्तर प्रदेश आणि दिल्लीसह १६ राज्यांमध्ये पावसाची प्रतीक्षा वाढली आहे. दक्षिण भारतातून पुढे सरकल्यानंतर, मोसमी पाऊस महाराष्ट्र, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशच्या आसपास थांबला आहे. ईशान्येकडील राज्यांमधून पुढे सरकल्यानंतर, तो बिहार, झारखंड आणि पश्चिम बंगालमध्ये थांबला आहे.

कोकणात आल्यानंतर थांबलेल्या मान्सूनमध्ये प्रगती होण्याची आशा असतानाच सॅटेलाईटने टिपलेल्या छायाचित्रांनी काहीसी चिंता वाढवली आहे. उपग्रहाच्या फोटोंमध्ये मान्सून भारतातून पूर्णपणे गायब झाल्यासारखा दिसत आहे. देशाच्या दक्षिण आणि मध्य भागात मोसमी पाऊस पोहोचल्यानंतर अवघ्या काही दिवसांतच पावसाच्या गतीमध्ये मोठी घसरण झाली आहे. १५ जून रोजी 'इन्सॅट-३डीएस' या उपग्रहाने टिपलेल्या फोटोंमध्ये ही परिस्थिती अधिकच स्पष्टपणे समोर आली आहे. सक्रिय मान्सूनशी संबंधित असलेला ढगांचा मोठा थर दिसण्याऐवजी, बहुतांश द्वीपकल्पीय आणि मध्य भारतात आकाश असामान्यपणे निरभ्र दिसत आहे. ढगांची मुख्य हालचाल हिमालय, ईशान्य भारत आणि इंडो-गंगेच्या खोऱ्यात उत्तरेकडील भागांवर केंद्रित झाली आहे. दुसरीकडे अरबी समुद्रातील मान्सूनची शाखाही कमकुवत आणि विखुरलेली दिसत आहे.

मागील काही दिवसांमध्ये मान्सूनने कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र आणि मध्य भारताच्या काही भागांत प्रगती केली असली, तरी हा वेग चिंता वाढावी इतका मंदावला आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते, मूळ कारण आजूबाजूच्या समुद्रातील आर्द्रतेच्या कमतरतेची नसून, जमिनीपासून काही किलोमीटर वर (उच्च वातावरणात) सुरू असलेल्या मोठ्या प्रमाणावरील संघर्षाचे आहे. या समस्येच्या केंद्रस्थानी पश्चिमेकडून वाहणारा वेगवान वायू प्रवाह आहे. उच्च वातावरणातील हा वेगाने वाहणारा हवेचा प्रवाह नेहमीपेक्षा खूपच दक्षिणेकडे सरकला आहे. या असामान्य बदलामुळे पूर्वेकडून वाहणार वेगवान वायू सक्रिय होण्यात अडथळा येत आहे, जो भारतातील मान्सूनचे चक्र टिकवून ठेवण्यासाठी मुख्य इंजिन म्हणून काम करतो. पुढील दोन दिवसांचा हवामान अंदाज पाहिल्यास १६ जून रोजी बिहार, झारखंड, ओडिशा, पश्चिम बंगाल आणि सिक्कीममध्ये पावसाची शक्यता आहे. बिहारच्या काही भागांत ताशी ५०-७० किमी वेगाने जोरदार वारे वाहू शकतात. आसाम, मेघालय, अरुणाचल प्रदेश आणि तामिळनाडू, पुद्दुचेरी व कर्नाटकच्या काही भागांत मुसळधार पावसाची शक्यता आहे. राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि विदर्भात मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. अनेक भागांत ताशी ४०-६० किमी वेगाने जोरदार वारे वाहण्याची शक्यता आहे. तसेच १७ जून रोजी सिक्कीम, उत्तर बंगाल, आसाम आणि मेघालयमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. राजस्थान आणि मध्य प्रदेशमध्ये जोरदार वाऱ्यांसह (ताशी ४०-६० किमी) पाऊस पडू शकतो. झारखंड, ओडिशा आणि पश्चिम बंगालमध्ये मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. तामिळनाडू, पुद्दुचेरी, कर्नाटक आणि महाराष्ट्राच्या काही भागांत पाऊस सुरू राहू शकतो.



महाराष्ट्राच्या काही भागांत १७ जूनपर्यंत उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, मराठवाड्यात १७ जूनपर्यंत आणि विदर्भात १६ जूनपर्यंत उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, कोकण आणि गोव्यामध्ये १७ जूनपर्यंत उष्ण आणि दमट हवामान राहण्याचा अंदाज आहे. तसेच, कोकण आणि गोव्याच्या काही भागांत १६ जूनपर्यंत रात्रीच्या वेळीही उष्ण हवामान कायम राहण्याची शक्यता आहे.

# लांब पल्ल्याच्या जमिनीवर मारा करणाऱ्या क्रूझ क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : डीआरडीओ म्हणजेच संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने आज, १५ जून २०२६ रोजी ओदिशाच्या किनारपट्टीवर असलेल्या डॉ. एपीजे अब्दुल कलाम बेटावरून लांब पल्ल्याच्या जमिनीवर मारा करणाऱ्या क्रूझ क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेतली. चांदीपूर इथल्या एकात्मिक चाचणी श्रेणीद्वारे तैनात केलेल्या विविध ट्रॅकिंग उपकरणांनी संकलित केलेल्या माहितीनुसार, या चाचणीअंतर्गत समोर ठेवलेली सर्व उद्दिष्टे यशस्वीरित्या साध्य केली गेली.

हे लांब पल्ल्याचे जमिनीवर मारा करणारे क्रूझ क्षेपणास्त्र संपूर्णपणे स्वदेशी बनावटीचे क्षेपणास्त्र आहे. या क्षेपणास्त्राच्या सर्व उपप्रणाल्या संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेच्या विविध प्रयोगशाळा आणि या उद्योग क्षेत्रातील भारतीय भागीदारांनी विकसित केल्या आहेत. बंगळुरू इथल्या एरोनॉटिकल विकास संस्था ही या उपक्रमासाठीची मुख्य समन्वयक प्रयोगशाळा आहे. संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचे वरिष्ठ अधिकारी आणि भारतीय नौदल तसेच या क्षेपणास्त्र वापरात आणणाऱ्या भारतीय वायुसेनेच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत हे प्रक्षेपण पार पडले. लांब पल्ल्याच्या जमिनीवर मारा करणाऱ्या या क्रूझ क्षेपणास्त्राच्या यशस्वी चाचणीबद्दल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचे पथक तसेच या उद्योगक्षेत्रातल्या भागीदारांचे अभिनंदन केले आहे. संरक्षण सचिव आणि संरक्षण (संशोधन आणि विकास) विभाग सचिव तसेच संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचे अध्यक्ष राजेश कुमार सिंह यांनी या प्रक्षेपणादरम्यानच्या सर्व घडामोडींवर देखरेख ठेवली. या यशस्वी चाचणीमध्ये सहभागी असलेल्या पथकातील सर्व सदस्यांचेही त्यांनी अभिनंदन केले.

# २२ जूनपासून राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


मुंबई : महाराष्ट्र राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन मुंबईत २२ जून ते १० जुलै २०२६ या कालावधीत होणार आहे. विधानसभा व विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. विधानभवन येथे आयोजित बैठकीस विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ड.राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, उच्च व तंत्र शिक्षण तसेच संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्यासह आमदार सुधीर मुनगंटीवार,दीपक केसरकर, नाना पटोले, जयंत पाटील, आमदार डॉ. नीलम गोऱ्हे, अनिल परब, प्रसाद लाड, हेमंत पाटील, प्रवीण दरेकर, विक्रम काळे, सतेज पाटील, विधिमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे व संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.




## शांतता कराराचे पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून स्वागत

# अमेरिका-इराणमध्ये ऐतिहासिक शांतता करार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




वॉशिंग्टन / तेहरान : गेल्या अनेक महिन्यांपासून पश्चिम आशियात (मध्यपूर्व) धगधगणाऱ्या युद्ध आणि लष्करी तणावाला अखेर पूर्णविराम मिळणार आहे. अमेरिका आणि इराण यांच्यात एका ऐतिहासिक शांतता कराराचा मार्ग मोकळा झाला असून, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या अत्यंत महत्त्वाच्या घडामोडीची घोषणा केली आहे. आगामी शुक्रवार, १९ जून रोजी स्वित्झर्लंडमधील जिनेव्हा येथे दोन्ही देशांमध्ये या ऐतिहासिक करारावर अधिकृत स्वाक्षऱ्या होणार आहेत. दोन्ही देशांमध्ये १४ सूत्रीय सामंजस्य करारावर सहमती झाली आहे. या करारामुळे जागतिक तेलपुरवठा पुन्हा सुरळीत होऊन जागतिक अर्थव्यवस्थेला मोठा दिलासा मिळण्याची आशा व्यक्त होत आहे.

राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'ट्रुथ'वर इराणसोबतचा करार पूर्ण झाल्याचे जाहीर केले. व्हाईट हाऊसमध्ये आपल्या ८० व्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'यूएफसी' कार्यक्रमाच्या काही तास आधीच ट्रम्प यांनी ही ऐतिहासिक घोषणा केली.

ट्रम्प यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले, इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराणसोबतचा करार आता पूर्ण झाला आहे. सर्वांचे अभिनंदन! मी याद्वारे 'स्ट्रेट ऑफ होर्मुझ' (होर्मुझची सामुद्रधुनी) विनाशुल्क खुली करण्यास पूर्ण मंजुरी देत आहे. त्याचबरोबर अमेरिकेची नौदल नाकेबंदी त्वरित उठवण्यासही अधिकृत मान्यता देत आहे. जगातील जहाजांनो, तुमची इंजिने सुरू करा. तेलाचा प्रवाह सुरू होऊ द्या! या करारामुळे संपूर्ण मध्यपूर्वेत कायमस्वरूपी शांतता आणि स्थैर्य येईल, असा दावाही त्यांनी केला.

हा शांतता करार एकूण तीन मुख्य टप्प्यांत राबवला जाणार आहे. तत्काळ युद्धविराम लागू केला जाईल. लेबनॉनसह सर्व आघाड्यांवरील लष्करी कारवाया कायमच्या थांबवल्या जातील आणि इराणवरील नौदल नाकेबंदी हटवून होर्मुझ सामुद्रधुनी खुली केली जाईल. करारावर स्वाक्षरी झाल्यानंतर पुढील ३० दिवसांच्या आत इराणची अमेरिकेकडे गोठवलेली २४ अब्ज डॉलरची मालमत्ता टप्प्याटप्प्याने मुक्त केली जाईल. यातील पहिली १२ अब्ज डॉलरची रक्कम वाटाघाटी सुरू होण्यापूर्वीच दिली जाण्याची शक्यता आहे. त्यानंतर पुढील ६० दिवसांच्या आत इराणच्या अणुकार्यक्रमावर सविस्तर आणि अंतिम चर्चा केली जाईल. या वाटाघाटी पूर्ण झाल्यानंतर उर्वरित १२ अब्ज डॉलरची रक्कमही इराणला सुपूर्द केली जाईल.

दुसरीकडे, इराणने या कराराचे स्वागत केले असले तरी अत्यंत सावध भूमिका घेतली आहे. इराणचे उपपरराष्ट्र मंत्री काझेम गारीबाबादी यांनी स्पष्ट केले की, अमेरिकेने शत्रुत्व संपवणे, नाकेबंदी उठवणे आणि इराणची संपत्ती खुली करणे या अटी पूर्ण केल्याची खात्री पटल्यानंतरच इराण ६० दिवसांच्या औपचारिक वाटाघाटींच्या टप्प्यात प्रवेश करेल.

दरम्यान, इराणच्या 'सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेने' हा करार म्हणजे तेहरानचा मोठा राजनैतिक विजय असल्याचा दावा केला आहे. जनतेचा खंबीर पाठिंबा आणि लष्कराच्या प्रयत्नांमुळेच अमेरिकेला नमते घ्यावे लागले, असे परिषदेने म्हटले आहे.

# कर्तव्यापलीकडे जाऊन सेवा; पोलीस निरीक्षक शकील शेख यांनी मध्यरात्री बुजवले धोकादायक खड्डे!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कर्तव्याची मर्यादा ओळखून समाजासाठी झटणाऱ्या अधिकाऱ्यांची कमतरता नसते, याचाच प्रत्यय कळंब शहरात पुन्हा एकदा आला. कळंब पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शकील शेख यांनी मध्यरात्री पुढाकार घेऊन रस्त्यावरील धोकादायक खड्डे बुजवून संभाव्य अपघात टाळले.

कळंब शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील रस्त्यावर गेल्या काही दिवसांपासून तीन मोठे खड्डे पडले होते. या खड्ड्यांमुळे दुचाकी, चारचाकी वाहन चालकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. रात्रीच्या वेळी हे खड्डे न दिसल्याने अपघात होण्याची शक्यता वाढली होती.

नगर परिषदेच्या कारवाईची वाट न पाहता पोलीस निरीक्षक शकील शेख यांनी सामाजिक बांधिलकीतून थेट

**कळंब मध्ये वाहनचालकांसाठी ठरले देवदूत; नागरिकांकडून भरभरून कौतुक**

कृती केली. वाहतूक कमी असलेल्या रात्री ११ वाजण्याच्या सुमारास त्यांनी खाजगी मिक्सर बोलावून घेतला आणि स्वतःच्या उपस्थितीत रस्त्यावरील तिन्ही धोकादायक खड्डे बुजवून घेतले.

रस्त्यावरील खड्ड्यांमुळे कोणतीही दुर्घटना घडू नये, नागरिकांचा जीव धोक्यात येऊ नये आणि वाहतूक सुरळीत राहावी या उद्देशाने त्यांनी ही तत्परता दाखवली. त्यांच्या या कृतीमुळे वाहनचालक, नागरिक आणि पादचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. पोलीस निरीक्षक शेख यांच्या या लोकहिताच्या कामाचे कळंब शहरात सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

नागरिकांकडून कर्तव्याच्या पलीकडे जाऊन समाजासाठी काम करणारा



अधिकारी अशी भावना व्यक्त होत असून, त्यांच्या या उपक्रमामुळे अनेक संभाव्य अपघात टळल्याचे वाहनधारकांनी सांगितले.

## संपादकीय....

### पावसाचा तुटवडा

भारतात नैऋत्य मोसमी पावसाचा वेग मंदावला आहे. सोमवार, १५ जून रोजीच्या उपग्रह प्रतिमांमध्ये देशाच्या मोठ्या भागावर मोसमी ढगांचा अभाव दिसून आला. हवामान विभागाच्या मते, ४ ते १५ जून दरम्यान देशात सरासरी ५३.७ मिमी पाऊस पडायला हवा होता, परंतु केवळ १९.२ मिमी पाऊस झाला, ज्यामुळे पावसाची ६४ टक्के तूट निर्माण झाली आहे. मोसमी पावसाच्या मंदावण्यामुळे राजस्थान, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, बिहार, उत्तर प्रदेश आणि दिल्लीसह १६ राज्यांमध्ये पावसाची प्रतीक्षा वाढली आहे. दक्षिण भारतातून पुढे सरकल्यानंतर, मोसमी पाऊस महाराष्ट्र, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशच्या आसपास थांबला आहे. ईशान्येकडील राज्यांमधून पुढे सरकल्यानंतर, तो बिहार, झारखंड आणि पश्चिम बंगालमध्ये थांबला आहे. कोकणात आल्यानंतर थांबलेल्या मान्सूनमध्ये प्रगती होण्याची आशा असतानाच सॅटेलाईटने टिपलेल्या छायाचित्रांनी काहीसी चिंता वाढवली आहे. उपग्रहाच्या फोटोंमध्ये मान्सून भारतातून पूर्णपणे गायब झाल्यासारखा दिसत आहे. देशाच्या दक्षिण आणि मध्य भागात मोसमी पाऊस पोहोचल्यानंतर अवघ्या काही दिवसांतच पावसाच्या गतीमध्ये मोठी घसरण झाली आहे. १५ जून रोजी 'इन्सॅट-३डीएस' या उपग्रहाने टिपलेल्या फोटोंमध्ये ही परिस्थिती अधिकच स्पष्टपणे समोर आली आहे. सक्रिय मान्सूनशी संबंधित असलेला ढगांचा मोठा थर दिसण्याऐवजी, बहुतांश द्वीपकल्पीय आणि मध्य भारतात आकाश असामान्यपणे निरभ्र दिसत आहे. ढगांची मुख्य हालचाल हिमालय, ईशान्य भारत आणि इंडो-गंगेच्या खोऱ्यात उत्तरेकडील भागांवर केंद्रित झाली आहे.

## देशातील पहिल्या पवन ऊर्जा पुरवठा साखळी पोर्टलचा शुभारंभ

पणजी : भारताची नवीकरणीय ऊर्जा परिसंस्था बळकट करण्याच्या आणि देशाच्या स्वच्छ ऊर्जेकडे होणाऱ्या संक्रमणाला गती देण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून, केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी आज गोव्यात आयोजित 'ग्लोबल विंड डे कॉन्फरन्स २०२६' मध्ये 'डब्ल्यूटी-मारुत' (विंड टर्बाइन मटेरियल्स अँड रिसोर्सेस युटिलिटी ट्रॅकर) या भारतातील पहिल्या वहिल्या 'पवन ऊर्जा टर्बाइन साहित्य पुरवठा साखळी व्यवस्थापनासाठी समर्पित पोर्टल'चा आरंभ केला. नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा खात्याचे राज्यमंत्री श्रीपाद येस्सो नाईक; गोवा सरकारच्या नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा विभागाचे मंत्री सुदिन ढवळीकर; नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाचे सचिव संतोष कुमार सारंगी; तसेच उत्पादक आणि प्रतिनिधी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

## अधिक महिन्यात पंधरा लाख भाविकांनी घेतले विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

अधिक महिन्यात नागरिक तीर्थक्षेत्रामध्ये भेटी देऊन देवाचे दर्शन घेण्यात अधिक मासानिमित्त १५ मी ते १४ जून पर्यंत या कालावधी विठ्ठल-रुक्मिणीचे मुखव चरण दर्शन पंधरा लाख भाविकांनी घेतले व मंदिर समितीला कोट्यावधी रुपयाचा उत्पन्नामध्ये वाढ झालेली आहे.

अधिक महिना सुरू झाल्यापासून पंढरपुरात विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी दररोज एक लाखाहून अधिक भाविक पंढरपूरमध्ये दाखल होत होती त्यामुळे पंढरपुरात भाविकांची गर्दी असल्याची दिसून येत होते व विठ्ठलाच्या पदस्पर्श



दर्शनासाठी दररोज रिद्धी सिद्धी गणपती मंदिरापर्यंत दर्शन रांग जात होती.

व अधिक महिन्यात विठ्ठल रुक्मिणीचे पाच लाख ३५ हजार भाविकांनी चरण दर्शन घेतले तर नऊ लाख तीस हजार भाविकांनी मुखदर्शन घेतले एकूण १५ लाख भाविकांनी दर्शन घेतल्याची दोन मंदिर समीर कडे आले आहे विठ्ठलाच्या दर्शनाला आलेली भाविक मंदिर समिती देणगी देतील देतात व दर्शन विठ्ठल व रुक्मिणीच्या चरणावर दक्षिणा अर्पण करतात मंदिर समितीने विठ्ठलाच्या प्रसाद म्हणून लाडू विक्री सुरू केली आहे तसेच विठ्ठलाचे फोटो व विविध वर्गातून मंदिर समितीला कोट्यावधी रुपयाची उत्पन्न मिळाले आहे.

## सराईत वाळु तस्कर जानुकाका कंडरे सोलापूर जिल्ह्यातून हद्दपार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहर पोलीस ठाणे हददीतील सराईत वाळु तस्कर गुन्हेगार जानुकाका उर्फ जालिंदर मोहन कंडरे रा. कंडरे चौक, पंढरपुर ता. पंढरपुर जि. सोलापुर यांचेविरूध्द वरिष्ठ पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे पंढरपुर शहर पोलीस ठाणे यांनी महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६(१)(ब) प्रमाणे तडीपारीचा प्रस्ताव तयार करून हददपारीचे कारवाईबाबत उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांना अहवाल सादर केला होता. त्याबाबत सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत यांनी सदर हददपार करणेच्या संदर्भातील काम चालवुन सदरबाबतचा सविस्तर अहवाल उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांचेकडे सादर केला होता. त्या अनुशंगाने वाळु तस्कर जानुकाका उर्फ जालिंदर मोहन कंडरे रा. कंडरे चौक, पंढरपुर ता. पंढरपुर जि. सोलापुर यास ०२ वर्षे कालावधीकरीता संपुर्ण सोलापूर जिल्हयातुन हददपार करण्यात आले असून सदरची नोटीस ही हददपार इसम यांना ताब्यात घेवून बजावण्यात आली आहे. तसेच पंढरपुर शहरातील इतर सराईत गुन्हेगारांवर कठोर परिणामकारक प्रतिबंधक कारवाई करणेचे कामकाज सुरू आहे. सदरची कामगीरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे, पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोसई नितीन जगताप, सपोफौ कल्याण ढवणे, पोलीस नाईक सचिन इंगळे, तसेच स्थानिक गुन्हे शाखा, सोलापुर ग्रामीणचे अनिस शेख व सायबर सेलचे रतन जाधव यांनी केली आहे.

पालक प्रवास उपक्रमांतर्गत घाटकोपर विधानसभा क्षेत्रातील समस्यांवर

## पालकमंत्री आशिष शेलार यांची बैठक; विकास कामांना गती देण्याचे निर्देश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : कॅबिनेट मंत्री तथा मुंबई उपनगराचे पालकमंत्री ॲड.आशिष शेलार आणि महापौर रितू तावडे यांनी घाटकोपर विधानसभा क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांसोबत पालक प्रवास उपक्रमांतर्गत महत्त्वपूर्ण बैठक घेत विविध स्थानिक समस्या जाणून घेतल्या.यावेळी नागरिकांच्या सोयीसुविधा व प्रलंबित विकासकामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.या बैठकीदरम्यान पार्कसाईट वॉर्ड क्र.१२३/१२४ मधील विविध विकास कामांसंदर्भातील निवेदन भाजपा पार्कसाईट मंडळ अध्यक्ष संतोष गांजले यांनी सादर केले.यामध्ये रस्ते दुरुस्ती,जलनिस्सारण व्यवस्था,स्वच्छता,सार्वजनिक सुविधा तसेच इतर नागरी समस्यांचा समावेश होता.

निवेदनातील मुद्द्यांवर सखोल चर्चा करून पालकमंत्री ड.आशिष शेलार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.तसेच विभागातील विकासकामांना गती देऊन नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडविण्यात येतील,अशी ग्वाही यावेळी देण्यात आली.या बैठकीमुळे पार्कसाईट विभागातील प्रलंबित प्रश्न मार्गी लागण्यास मदत होणार असून स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## झेप किशोरी विकास प्रकल्पांतर्गत गरजू मुलींना शेळ्या, सायकल, शिलाई मशीन व शैक्षणिक साहित्याचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदगी (एस. के. गायकवाड) : हॅलो मेडिकल फाउंडेशन, अणदूर व स्विस-एड संस्थेच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणारा झेप किशोरी विकास प्रकल्पा अंतर्गत तुळजापूर तालुक्यातील धनगरवाडी, सराटी सह तुळजापूर व लोहारा तालुक्यातील काही गावांमध्ये गरजू किशोरवयीन मुलींना शालेय साहित्य( बॅग ), सायकल,शिलाई मशीन व शेळ्याचे वाटप करण्यात आले.

या बाबत सविस्तर वृत्त असे की हॅलो मेडिकल फाउंडेशन अणदूर व स्विसएड संस्थेच्या संयुक्त विद्यमाने रावीविण्यात येणारा झेप किशोरी विकास प्रकल्प जून २०२५ पासून तुळजापूर व लोहारा तालुक्यातील ३० गावांमध्ये कार्यरत आहे. १३ ते १७ वयोगटातील मुलींच्या लिंगभाव दृष्टिकोनात





सकारात्मक बदल घडवून आणणे, निर्णयक्षमता वाढवणे, जीवन कौशल्ये विकसित करणे तसेच बालविवाह रोखण्यासाठी मुलींना सक्षम बनवणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे.

यासाठी पालक, युवक व शासकीय यंत्रणांचा सहभाग वाढवून जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याचे काम प्रकल्पामार्फत केले जात आहे.

प्रकल्पांतर्गत गावपातळीवरील सखींच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जात असून गरजू व असुरक्षित मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात कायम ठेवण्यासाठी उत्पन्नवाढीची साधने उपलब्ध करून दिली या प्रकल्पांतर्गत लोहारा आणि तुळजापूर तालुक्यातील ३० गावांमध्ये शेळ्या, शिलाई मशीन, सायकल व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

तुळजापूर आणि लोहारा तालुक्यातील ९५ मुलींना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले, १९ मुलींना शेळीपालनासाठी मदत करण्यात आली,

१३ मुलींना शिलाई मशीन वाटप करण्यात आली, ८ मुलींना सायकल वाटप करण्यात आली या मदतीमुळे मुलींचे शिक्षण सुरू राहण्यास व त्यांच्या कुटुंबाच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होणार आहे.

या कार्यक्रमासाठी स्विसएड संस्थेच्या स्नेहा गिरिधारी मॅडम, प्रकल्प अधिकारी जितेंद्र सावकर, हॅलो मेडिकल फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. शुभांगी अहंकारी, प्रकल्प संचालक डॉ. क्रांती रायमाने, प्रकल्प समन्वयक नागिनी सुरवसे, किशोरी सहाय्य समितीचे सदस्य दिनकर गाढवे व जावेद शेख, प्रकल्प अकाउंटंट मुन्नाबी इनामदार, डाटा कलेक्टर मिराज नदाफ तसेच पर्यवेक्षिका रत्नमाला खरोसे, सुमती कानडे, शीला भोजने, पल्लवी गायकवाड यांचे सहकार्य लाभले.

## आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या हस्ते एखतपूर केंद्र शाळेत प्रवेशोत्सव व वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला, प्रतिनिधी : जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा, एखतपूर येथे नव्या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त प्रवेशोत्सव व वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमास आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्यासह विविध मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सवाद्य मिरवणुकीने झाली. यावेळी गावातील मुख्य चौकात छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख, जिल्हा परिषद सदस्या सिंधुताई मोहन आलदर, गटशिक्षणाधिकारी सुयोग नवले, सरपंच वर्षाताई जाधव तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा प्रतिक्षा नीलकंठ यांच्या हस्ते करण्यात आले. एखतपूर केंद्र शाळा, लिंगेवस्ती, जगतापवस्ती व रामरहीमनगर येथील शाळांमधील इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. खाजगी शाळांमधून जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेतलेल्या २० विद्यार्थ्यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

मुख्याध्यापक हणमंत जाधव यांनी प्रास्ताविकात शाळेच्या विविध शैक्षणिक उपक्रमांची, मिळालेल्या यशाची व आवश्यक भौतिक सुविधांच्या मागण्यांची माहिती दिली. यावेळी मार्गदर्शन करताना आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा देत प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून घेतल्यास मुलांचा सर्वांगीण विकास होतो, असे सांगितले. स्वतःचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेत मराठी माध्यमातून झाल्याचा उल्लेख करून त्यांनी शाळेच्या आवश्यक मागण्या पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमास गटशिक्षणाधिकारी सुयोग नवले, केंद्रप्रमुख सुखदेव लवटे, ग्रामविकास अधिकारी शंकर मेटकरी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य हरिबा इंगोले (नाना), ग्रामपंचायत



पदाधिकारी, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक, ग्रामस्थ व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षक दिलीप नवले, भारत मेटकरी, नीलकंठ मॅडम, ज्ञानेश्वर इंगोले, निसार इनामदार, काळेबाग गुरुजी, संजय बुरांडे आदींनी विशेष परिश्रम घेतले. ज्ञानेश्वर इंगोले यांनी आभार मानले. खाऊ वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पंढरपूर येथील अन्नदात्यांसाठी अन्नत्याग आंदोलन स्थगित

## नामदेव पायरीवर उपोषणाची सांगता; जाचक अटी शर्ती काढून टाकण्यात सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

सरकारने शेतकरी कर्जमाफी योजनेलापुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरयांचे नाव दिले परंतु अटी शर्ती टाकल्यामुळे बहुतांश शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहणार होते आणि हा एक प्रकारे पूर्ण श्लोक आहिल्यादेवी होळकर यांचाही अवमान आहे. ही गोष्ट पंढरपुरात अन्न त्या आंदोलन सुरू करून आम्ही सरकारच्या निदर्शनास आणून दिली त्यावर सुरुवातीला अटी शर्ती नाकारणारा सरकार असा या अटीची काढण्याबाबत तयार झाले, हे या आंदोलनाची यश आहे असे रोहित पवार म्हणाले.

मंत्री गिरीश महाजन यांनी पंढरपुरात आंदोलन स्थळी भेट देऊन इथूनच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संपर्क साधून चर्चा केली आणि येत्या पावसाळी अधिवेशनापूर्वी म्हणजेच २२ जून पूर्वी मुंबईत बैठक घेऊन कर्जमाफीला या जाचक अटी शर्ती काढून टाकण्यात सकारात्मक निर्णय घेण्याचा आश्वासन दिले.

त्यामुळे इथे तीन दिवस सुरू असलेल्या अन्न त्या कांदोलन तात्पुरती स्थगित करण्यात आले व महाराष्ट्रातील तमाम वारकऱ्यांच्या श्रद्धास्थान असलेल्या नामदेव पायरीवर उपोषणाची सांगता करण्यात आली. महाराष्ट्रातील तमाम वारकऱ्यांच्या श्रद्धास्थान असलेल्या नामदेव पायरीजवळ माझ्यासोबत सर्व उपोषण करते वारकरी शेतकरी पदाधिकारी आणि कार्यकर्ते या सर्वांच्या उपस्थितीत महारथी करून उपोषणाची औपचारिक रित्या सांगता करण्यात आली.

शेतकऱ्यांच्या कर्जमाफी विषयाकडे राजकारणाच्या पलीकडे बघितली पाहिजे. अशी आमची भूमिका आहे. त्यामुळे ही बैठक होणार आहे त्या बैठकीत शिष्ट मंडळ हर्षवर्धन सपकाळ, राजू शेट्टी, शशिकांत शिंदे, अजित नवले, वामनराव चटप, महादेव जानकर, प्रवीण दादा गायकवाड, रविकांत तुपकर, यांचा समावेश असणार आहे अन्नदात्यांसाठीच आंदोलन असल्याने सरकारलाही एक संधी देणे महत्त्वाचे होते आंदोलन आधी ताणून धरल्यानंतर हाती काही लागत नाही त्यामुळे व्यक्तिगत नाही तर राज्यातील शेतकऱ्यांचे नुकसान झाले असते आणि ते आपल्याला होऊ द्यायचे नव्हते म्हणून हा निर्णय घेतला अशी माहिती रोहित पवार यांनी दिली.

यावेळी रोहित पवार म्हणाले की, आता सरकारने विठुरायाच्या पवित्र भूमीत येऊन कर्जमाफी योजनेतील अटी शर्ती काढण्याचा शब्द दिल्याने हे दिलेला शब्द पाटील आणि राज्यातील शेतकऱ्यांना न्याय देतील अशी अपेक्षा आहे. परंतु मुख्यमंत्र्यासोबतच्या बैठकीत सकारात्मक निर्णय झाला नाही तर मात्र रस्त्यावरची मोठी लढाई लढणार, ही बाब ही सरकारने लक्षात घ्यावी या आंदोलनाला पाठिंबात दिलेली राज्यभरातील शेतकरी मालकास आघाडीतील सर्व घटक पक्ष विविध संस्था संघटना प्रत्यक्ष येऊन भेटलेली नेते फोनवरून आणि सोशल



मीडियातून पाठिंबा दिलेली सर्वजण तसेच माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिलेली माझे कुटुंब व सर्वांचेच मनापासून आभार मानतो असे रोहित पवार म्हणाले.

# सारोळा मांडव्यात ग्राम महसूल अधिकाऱ्यांकडून एल-निनोच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना मार्गदर्शन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दिपक क्षिरसागर /वाशी : वाशी तालुक्यातील मौजे सारोळा मांडवा येथे ग्राम महसूल अधिकारी डि.व्ही. सिरसेवाड पाटील यांनी एल-निनोमुळे येणाऱ्या पावसाच्या अनियमिततेच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन मार्गदर्शन केले.

यावर्षी पाऊस अनियमित राहण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांनी घाबरून न जाता हवामान बदलानुसार शेतीचे नियोजन करावे, असे त्यांनी सांगितले. एकाच पिकावर अवलंबून न राहता कमी कालावधीत आणि कमी पावसात येणारी पिके घ्यावीत. जास्तीत जास्त आंतरपिके घेऊन जोखीम विभागावी आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले. शेतीसोबत जोडधंदा सुरू करावा आणि रासायनिक खतांऐवजी नैसर्गिक शेतीकडे वळावे, असेही ते म्हणाले. पावसाळ्यापूर्वी मृदा व जलसंधारणाची कामे, वृक्ष लागवड आणि त्याचे जतन करण्यावर भर द्यावा. बांधाच्या वादात न अडकता सामोपचाराने प्रश्न सोडवावेत आणि गटशेतीच्या माध्यमातून एकमेकांना सहकार्य करावे. गावात गटातटाचे राजकारण न करता विकासासाठी एकत्र येऊन शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन ग्राम महसूल अधिकारी सिरसेवाड पाटील यांनी केले.

या मार्गदर्शनामुळे शेतकऱ्यांमध्ये सकारात्मक प्रतिसाद दिसून आला.

# तांदुळवाडी शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात साजरा





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी/ सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांदुळवाडी येथे प्रवेशोत्सव क्रमांक दोन अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समिती सभापती सन्माननीय सौ पूजा तुषार शिंदे यांची प्रमुख उपस्थिति लाभली. या कार्यक्रमात शाळेतील इयत्ता पहिली प्रवेश पात्र विद्यार्थ्यांची गावातून सजवलेल्या बैलगाडीतून मिरवणूक काढण्यात आली. बैलांना पारंपारिक रित्या झुली व इतर साहित्य यांनी सजविले. तसेच बैलगाडीची सुद्धा सजावट करून प्रवेश पात्र सर्व विद्यार्थ्यांना पुष्पहार,टोप्या व फुग्यांनी सजून गावातून त्यांची मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीमध्ये गावचे प्रथम नागरिक तथा सरपंच एडवोकेट प्रणित जी डिकले, शालेय कमिटीचे अध्यक्ष श्री माधवराव पाटील, गावचे उपसरपंच महावीर डिकले,शालेय समितीचे उपाध्यक्ष श्री जुबेर पठाण,शाळेचे मुख्याध्यापक श्री संतोष भोजने शाळेतील सर्व स्टाफ तसेच गावकरी पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होते.

प्रवेश फेरीनंतर मुख्य कार्यक्रमांमध्ये मागील शैक्षणिक वर्षात उल्लेखनीय यश मिळविलेल्या एमटीएस, एन एस एस,मीज्ञानी होणार, एन एस सी ई,शिष्यवृत्ती, नवोदय, इत्यादी विविध स्पर्धा परीक्षेमध्ये यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव आणि शैक्षणिक साहित्य देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून या शाळेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा पालकांच्या समवेत मान्यवरांकडून स्वागत आणि सत्कार करण्यात आला. इयत्ता पहिली प्रवेश पात्र विद्यार्थ्यांचे पहिले पाऊल याप्रसंगी जपून ठेवण्यात आले.प्रास्ताविकात श्री संतोष भोजने यांनी शाळेच्या भौतिक सोयी सुविधांचा आढावा घेत मागील वर्षात उपलब्ध झालेल्या सोयी सुविधाबद्दल ग्रामपंचायत आणि गावकऱ्यांचे आभार मानले. आणि पुढील काळात शाळेसाठी संगणक कक्ष, कमान, विद्यार्थ्यांना सभागृह या बरोबरच शाळेची रंगरंगोटी इत्यादी गोष्टीची मागणी केली असता सरपंच श्री प्रणित जी डिकले यांनी सर्व गोष्टीची आम्ही पूर्तता करू तुम्ही फक्त गुणवत्ता आणि विद्यार्थी हित यावर केंद्रित करा असे याप्रसंगी सांगितले. गावकरी, ग्रामपंचायत आणि पालक शाळेच्या भौतिक सुविधा पूर्ण करण्यास कटिबद्ध असल्याची ग्वाही सरपंच एडवोकेट प्रणित जी डिकले यांनी दिली. कार्यक्रमास गावातील बहुतांश माता, पालक अंगणवाडीच्या ताई पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पहिल्या दिवशीच्या मध्यान भोजनामध्ये सर्व विद्यार्थ्यांना गोड पदार्थ म्हणून जिलेबी आणि चविष्ट मध्यान भोजन देण्यात आले.या कार्यक्रमासाठी शाळेतील शिक्षक सर्वश्री संतोष मोहिते, सयाजी शिंदे शिक्षिका श्रीमती रसिका आगरकर, आशा पवार मध्यान्न भोजन कर्मचारी रुक्मिणी डिकले, मयुरी डिकले या सर्वांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती आशा पवार यांनी,प्रास्ताविक मुख्याध्यापक श्री संतोष भोजने यांनी तर आभार प्रदर्शन श्री संतोष मोहिते यांनी मानले.

# नारायण चिंचोली, भैरनाथवाडी येथे बस थांबा देण्याची ग्राम प्रशासनाची पंढरपूर एसटी आगार प्रमुखाकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील नारायण चिंचोली येथे पुरातन हेमाडपंथी दुर्मिळ असे सूर्यनारायणाचे मंदिर असून प्राचीन असून देवदर्शनासाठी येत असतात त्यामुळे येथील नारायण चिंचोली व भैरवनाथवाडी बस स्थानकावर बस थांबा मिळावा. अशा मागणीचे लेखी निवेदन ग्राम प्रशासनाच्या वतीने सरपंच नर्मदा लक्ष्मण धनवडे यांनी मागणी केली आहे.

नारायण चिंचोली हे गाव माढा मतदारसंघात येत असून पंढरपूर पासून अवघ्या दहा किलोमीटरवर असणाऱ्या भारतातील दुर्मिळ अशा मंदिरापैकी महाराष्ट्रातील एकमेव असे सूर्यनारायण देवाचे मंदिर असून या मंदिरास तीर्थक्षेत्राचा दर्जा असून जिल्ह्यासह राज्यभरातून दररोज शेकडो भाविक देव दर्शनासाठी येत असतात त्यामुळे भाविकांची संख्या अनेक भाविकांना या दोन्ही बस स्टैंड वर प्रवासासाठी ये जा करण्यासाठी तासन तास ताटकळत बसावे लागत आहे. येथील ग्रामस्थांना व बाहेरून येणाऱ्या भाविकांना अनेक वेळा खाजगी वाहनातून ना विलाज असतो जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. पंढरपूर आगारांतर्गत येणाऱ्या सर्व एसटी बसेसना नारायण चिंचोली व भैरवनाथवाडी येते थांबा देण्याची मागणी ग्रामस्थ व भाविकांच्या वतीने वारंवार होत आहे याची तात्काळ दखल घेत सरपंच सौ नर्मदा लक्ष्मण धनवडे पंढरपूर आगार प्रमुख यांच्याकडे लेखी निवेदन देऊन पंढरपूर आगारांतर्गत येणाऱ्या सर्व बसेसना थांबा मिळावा अशी मागणी केली आहे. या मागणीची तात्काळ दखल न घेतल्यास रस्ता रोको करून आंदोलन केले जाईल असा इशाराही नर्मदा धनवडे यांनी लेखी निवेदनाद्वारे दिला आहे. यावेळी भाजपा राज्य कार्यकारणी सदस्य लक्ष्मण धनवडे ग्रामसेवक संतोष गायकवाड, विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे सदस्य बापूराव कोले, सुनील माने अधिक ग्रामस्थ उपस्थित होते.

> नारायण चिंचोली येथे बस थांब्याबाबत ग्रामस्थांच्या वतीने सरपंच धनवडे यांचे निवेदन मिळाले असून या निवेदनावर पंढरपूर आगार अंतर्गत येणाऱ्या सर्व बसेस थांबा देण्याच्या लेखी सूचना देण्यात येतील व सांगोला, अकलूज आगाराच्या गाड्यांना नारायण चिंचोली, व भैरवनाथवाडी येथे थांबा देण्या कामी वरिष्ठ कार्यालयाकडे त्वरित पत्र व्यवहार करणार असून येथील ग्रामस्थांना व भाविकांना येण्या जाण्याची सोय होईल अशी व्यवस्था केली जाईल.
>
> – **अंकुश सलगर** (स्थानक प्रमुख पंढरपूर आगार)

# घोटी विद्यालयात नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प व पाठ्यपुस्तके देऊन स्वागत



सिन्नर/प्रतिनिधी (सोमनाथ गिरी ) : घोटी येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंत नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन ढोल ताशाच्या गजरात विद्यालयमार्फत स्वागत करण्यात आले. ढोल ताशाच्या गजरात गावातून मिरवणूक काढत विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत करण्यात आले.इयत्ता पाचवी ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकाचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विद्यालयाचे प्राचार्य नितीन भामरे यांनी आपल्या प्रास्ताविकात शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांविषयी माहिती देवून मान्यवरांचे स्वागत केले.

बऱ्याच कालावधी नंतर शाळेची घंटा वाजल्याने आज विद्यार्थ्यांची किलबिलाट ऐकू आली. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद व उत्साह दिसून येत होता. विद्यार्थी एकमेकाची आस्थेने व प्रेमाने विचारपूस करीत होते. विद्यार्थी गप्पा गोष्टीत रंगले होते .विद्यालयाच्या प्रवेशद्वारावर सडा टाकून रांगोळी काढली होती.

अध्यक्षस्थानी शालेय समितीचे अध्यक्ष मनोज भाऊ जाधव होते.व्यासपीठावर असिस्टंट कमिशनर श्रीम.व्ही. एस.चौधरी, उच्च माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष राजेंद्र आप्पा जाधव, शालेय समिती सदस्य नरेंद्र मेधने, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक भरत आरोटे, दिपताई कंदकुरीवार,सुनिता सिंघल,वैशाली ताई गोसावी, उद्योजक प्रशांत सोनवणे,माजी मुख्याध्यापिका विजया सोनवणे,प्राचार्य नितीन भामरे,उपमुख्याध्यापक उल्हास पवार, पर्यवेक्षक हिरामण चौधरी आदिंसह पालक उपस्थित होते.यावेळी शालेय समिती अध्यक्ष मनोज जाधव यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.शिक्षक शिकवित असतांना विद्यार्थ्यांनी वर्गात समरस व्हावे. चांगला अभ्यास करून उज्वल यश संपादन करून आई-वडिलांचे व शाळेचे नाव उज्ज्वल करावे असे आव्हान जाधव यांनी केले. विद्यार्थ्यांना शालेय पोषण आंतर्गत मिष्टान्न भोजनाचे वाटप करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी पोषण आहाराचा आस्वाद घेतला मान्यवरांच्या हस्ते विद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. सूत्रसंचालन सविता जाधव यांनी तर आभार गायत्री सूर्यवंशी यांनी मानले.यावेळी सोमनाथ गिरी, हेमंत झोले,सत्येन जाधव, प्रकाश तांबे,निवृत्ती सरगर,रमेश देवगिरे , कैलास पाचोरे, अविनाश निकम, घनश्याम भालेराव, ओमकार सोनवणे,मुख्य लिपिक रावसाहेब रणशेवरे,वरिष्ठ लिपिक जीवन शिंदे आदींसह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम करून घेतले.



## पुस्तके, फुगे, फुले,खाऊ, खेळ, गाणी आणि धमाल....

# 'वैनतेय' मध्ये लापशी ने वाढवली प्रवेशोत्सवाची गोडी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी :-निफाड येथील वैनतेय प्राथमिक विद्यामंदिरात शाळेच्या पहिल्या दिवशी नवागतांचे ढोलच्या गजरात उत्साहात स्वागत करण्यात आले. शाळेच्या पहिल्या दिवसापासून मुलांना दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे, एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही यासाठी पालक जागृती करून नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून गुलाबपुष्प, फुगे, टोप्या देवून स्वागत करण्यात आले.

याप्रसंगी न्या.रानडे विद्याप्रसारक मंडळाचे सचिव रतन वडघुले, विश्वस्त मधुकर राऊत, शाळेच्या मुख्याध्यापिका सुजाता तनपुरे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. शाळेतील शिक्षक गोरख सानप यांनी आनंददायी कृतीगीते सादर केली, किरण खैरनार यांनी बोधकथा व संजय जाधव, यांनी मनोरंजक खेळ घेऊन विद्यार्थ्यांचे मनोरंजन केले. मधल्या सुट्टीत पोषण आहारात मुलांनी मिष्टान्न लापशी व मसालेभाताचा मनसोक्त आस्वाद घेतला.

शाळेची भिती दूर करून विद्यार्थ्यांना आनंददायी पद्धतीने शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी राबविलेल्या प्रवेशोत्सवाचे न्या. रानडे विद्याप्रसारक मंडळ निफाड संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष वि. दा. व्यवहारे, सचिव रतन वडघुले, विश्वस्त किरण कापसे, राजेंद्र राठी, राजेश सोनी, ड. दिलीप वाघावकर, विश्वास कराड, मधुकर राऊत, प्रभाकर कुयटे, नरेंद्र नांदे, निफाड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी विलास साळी, विस्तार अधिकारी लता भरसट, कैलास बोरसे, केंद्रप्रमुख अनिता आहिरे व पालकांनी कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षकवृंदांनी परिश्रम घेतले.



**निफाड : वैनतेय प्राथमिक विद्यामंदिरात मोफत पाठ्यपुस्तके वाटप करतांना संस्थेचे सचिव रतन वडघुले, विश्वस्त मधुकर राऊत, मुख्याध्यापिका सुजाता तनपुरे, गोरख सानप, किरण खैरनार,व विद्यार्थी.**

# आचारसंहितेची ऐशीतैशी करत आमदार रोहित पवारांची पंढरपुरात 'स्टंटबाजी'

## भाजप किसान मोर्चा आक्रमक, गुन्हा दाखल करण्याची मागणी! जिल्हाधिकाऱ्यांच्या जमावबंदी आदेशाला वाटाण्याच्या अक्षता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

परवानगी नसताना बेकायदेशीर आंदोलन करून भाविक आणि प्रशासनाला वेठीस धरल्याचा आरोप

पंढरपूर (विशेष प्रतिनिधी) : एकीकडे विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू असताना आणि दुसरीकडे सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांचे कडक जमावबंदी आदेश लागू असताना, आमदार रोहित पवार यांनी पंढरपुरात बेकायदेशीर आंदोलन करत प्रशासकीय नियमांचा पुरता फज्जा उडवला आहे. अधिक मासानिमित्त विठ्ठलनगरीत भाविकांची अलोट गर्दी झालेली असताना, कोणतीही परवानगी न घेता केवळ राजकीय स्टंटबाजीसाठी मुख्य चौकात आंदोलन करून हजारो भाविक आणि स्थानिक नागरिकांना वेठीस धरल्याचा घणाघात भाजप किसान मोर्चाने केला आहे. याप्रकरणी आमदार रोहित पवार आणि त्यांच्या कार्यकर्त्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत, या मागणीचे जाहीर निवेदन आज पंढरपूरचे प्रांत अधिकारी आणि शहर पोलीस ठाण्यात देण्यात आले.

नियम फक्त सामान्य जनतेसाठी का? लोकप्रतिनिधींना मोकळे रान?

सध्या संपूर्ण जिल्ह्यात आचारसंहिता आणि जमावबंदी लागू आहे. असे असताना पंढरपूर नगरपालिकेकडून किंवा पोलीस प्रशासनाकडून आंदोलनाला कोणतीही अधिकृत परवानगी देण्यात आली नव्हती. तरीही केवळ राजकीय प्रसिद्धीच्या हव्यासापोटी मुख्य रस्त्यावर ठिय्या मांडून रस्ता अडवण्यात आला. यामुळे विठ्ठल



दर्शनासाठी मैलोन्मैल चालत आलेल्या वारकऱ्यांचे, भाविकांचे आणि स्थानिक व्यापाऱ्यांचे अतोनात हाल झाले. नियम काय फक्त सामान्य जनतेनेच पाळायचे का? कायद्याचे रक्षकच जर कायदा पायाखाली तुडवणार असतील, तर प्रशासनाचा वचक राहिला कुठे? असा संतप्त सवाल या निमित्ताने 'गावकुस'च्या माध्यमातून उपस्थित केला जात आहे.

*भाजप किसान मोर्चा मैदानात; पोलीस ठाण्यात धडक*

आमदार रोहित पवारांच्या या बेकायदेशीर आंदोलनाविरोधात भाजप किसान मोर्चाने आक्रमक पाऊल उचलले आहे. भाजपचे प्रदेश कार्यकारिणी निमंत्रित सदस्य तथा किसान मोर्चाचे प्रदेश चिटणीस *श्री. माऊली (भाऊ) हळणवर* यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आज पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक आणि प्रांत अधिकारी यांना थेट निवेदन सुपूर्द केले.

यावेळी बोलताना माऊली हळणवर म्हणाले की,

अधिक मासाच्या पवित्र काळात पंढरपुरात भाविकांची प्रचंड गर्दी असते. अशा वेळी शहराच्या मुख्य चौकात विनापरवानगी आंदोलन करणे म्हणजे निव्वळ स्टंटबाजी आहे. या आंदोलनामुळे वाहतूक कोंडी होऊन प्रशासनावर विनाकारण ताण आला आणि लाखो भाविकांची हेळसांड झाली. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाची पायमल्ली करणाऱ्या अशा आंदोलकांवर कडक कायदेशीर कारवाई झालीच पाहिजे.

**हे पदाधिकारी होते उपस्थित**

निवेदन देताना भाजप किसान मोर्चाचे माऊली हळणवर यांच्यासह संजय लवटे सर, विजय आण्णा मेटकरी, पैलवान नामदेव घोडके, पैलवान अण्णा घोडके, अजय देशमुख, गोपी पांढरे यांच्यासह अनेक प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आता या बेकायदेशीर आंदोलनावर पंढरपूर पोलीस आणि जिल्हा प्रशासन काय कारवाई करते, की राजकीय दबावापोटी याकडे कानाडोळा केला जातो, याकडे संपूर्ण सोलापूर जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# स्वेरी फार्मसीच्या सहा विद्यार्थ्यांचे जी-पॅट परिक्षेत यश!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूरः गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट, पंढरपूर संचलित औषधनिर्माणशास्त्र (बी.फार्मसी) महाविद्यालयातील सहा विद्यार्थ्यांना जी-पॅट (ग्रॅज्युएट फार्मसी ॲप्टीटयूड टेस्ट) २०२६ या राष्ट्रीय पातळीवरील परिक्षेत उज्वल यश मिळाल्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.




स्वेरी संचलित औषधनिर्माणशास्त्र तथा बी. फार्मसीच्या अंतिम वर्षात शिक्षण घेणारे भोसले काजल रणजीत गुण २३१, (ऑल इंडिया रँक ११५२), तांबोळी अलिशा गौस गुण २२१ (ऑल इंडिया रँक १५८७), घोडके मोनाली समाधान गुण १९८ (ऑल इंडिया रँक ३१६४), पृथ्वीराज साहेबराव भुसे गुण १९२ (ऑल इंडिया रँक ३७०७) हिल्लाळ श्रेया प्रमोद गुण १८३, ( ऑल इंडिया रँक ४६३५), काळे संदीप दत्तात्रय गुण १८१,(ऑल इंडिया रँक ४८६९) अशा एकूण सहा विद्यार्थ्यांनी एम. फार्मसीचे उच्च शिक्षण घेण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील अतिशय अवघड परंतु आवश्यक असणाऱ्या जी-पॅट या परिक्षेत उज्वल यश संपादन केले आहे. स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ. बी.पी.रोंगे यांच्या दिशादर्शक मार्गदर्शनाखाली, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.मिथुन मणियार यांच्या नेतृत्वाखाली तसेच उच्च शिक्षित प्राध्यापकांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले आणि फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या या परीक्षेत उत्तुंग यश मिळविले. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाचे पंढरपूर पंचक्रोशीत कौतुक होत आहे. सन २००६ साली स्थापन झालेल्या बी. फार्मसी महाविद्यालयाने प्रत्येक वर्षी मिळणाऱ्या उज्वल यशाची परंपरा यावर्षी देखील कायम राखली आहे. सन २०१० साली 'संतोष गेजगे' या विद्यार्थ्याने याच जी-पॅट परीक्षेत भारतात ११७ व्या क्रमांकाने उत्तीर्ण होऊन यशाचा पाया खणला होता. तेथून पुढे प्रत्येक वर्षी स्वेरीच्या बी. फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी जी-पॅट मध्ये भरघोस यश संपादन करण्याची परंपरा कायम राखली असल्याचे या निकालावरून दिसून येते. यशस्वी विद्यार्थी आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, शिक्षकांबरोबरच 'पंढरपूर पॅटर्न' व रात्र अभ्यासिकेला देखील देतात. मिळालेले यश हे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरणार आहे, हे मात्र निश्चित! सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना बी.फार्मसी प्राचार्य डॉ.मिथुन मणियार, प्रा.रामदास नाईकनवरे, डॉ.वृणाल मोरे, प्रा. अंबादास चिक्काळे प्रा.प्रदीप जाधव, प्रा. विजया पाटील आदी प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे स्वेरीचे संस्थापक डॉ. बी.पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सुरज रोंगे, यांच्यासह इतर विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी अंतर्गत असणाऱ्या बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ.एम.जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, लॉ कॉलेजच्या प्राचार्या डॉ. बनकर, इंजिनिअरींगच्या उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

# खामसवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हनुमंत पाटुळे/खामसवाडी (प्रतिनिधी) : कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आज दि. १५ जून २०२६ रोजी नवागत विद्यार्थी प्रवेशोत्सव, विद्यार्थी स्वागत, मोफत पाठ्यपुस्तक वितरण व गणवेश वाटप कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून समाज कल्याण सभापती विश्वास कोकणे, पंचायत समिती सदस्या सुवर्णाताई पाटील, सरपंच अमोल पाटील, उपसरपंच दयानंद पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजकुमार शेळके, उपाध्यक्ष श्रीनिवास झोरी, पत्रकार हनुमंत पाटुळे, शिवाजी बोबडे, दीपक सावंत, गोपाल शेळके तसेच शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने



उपस्थित होते.

नवागत विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन व टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व गणवेशांचे वितरण करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना नियमित शिक्षण घेऊन उज्वल भवितव्य घडविण्याचा संदेश दिला.

कार्यक्रमात मुख्याध्यापकांनी शाळेच्या शैक्षणिक, सांस्कृतिक व विविध उपक्रमांची माहिती देत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा कटिबद्ध असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. विश्वास गायकवाड यांनी केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक शिवराज बाकले, नागनाथ शेळके, सातलिंग लोखंडे, संगीता किरदत्त, रेखा रितापुरे, वैशाली मुळे तसेच सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

नवागत विद्यार्थ्यांच्या स्वागताने शाळेचा परिसर आनंद, उत्साह आणि चैतन्याने भरून गेला असून पालक व ग्रामस्थांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरातील गळतीची केली पोलखोल : आ. नीलम गोरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात संवर्धन व सुशोभीकरणाचे काम सुरू आहे मात्र मंदिराच्या छतावरून पाऊस व पाण्याची गळती होत आहे ही व्यक्ती ताबडतोब बंद करावी असा एकूण पुरातत्व विभाग व मंदिर समितीची काम केलेल्या ठेकेदारांना देण्यात आल्याची माहिती माजी विभाग परिषद असल्याचे आमदार नीलम गोरे यांनी दिली.

अधिक महिन्याच्या पार्श्वभूमीवर उपसभापती नीलम गोरे विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेण्यासाठी आल्या होत्या व दर्शन झाल्यानंतर पत्रकारांशी बोलताना गोरे म्हणाले की विठ्ठल-रुक्मिणी मंदिर प्राचीन असल्यामुळे याचे संवर्धन व सुशोभीकरण करण्यासाठी शासनाने कोठ्यावधी रुपयांचा निधी दिला आहे मात्र काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्यामुळे मंदिराच्या छता पाण्याची गळती होत आहे ही गळती ताबडतोब बंद करण्यात यावी असा सूचना आपण पुरातत्व विभाग व संवर्धनाचे काम करणाऱ्यांना ठेकेदारांना दिल्याची माहिती त्यांनी दिले आहे मंदिर संवर्धन आणि काम झाले असल्याची पोलखोल नीलम गोरे यांनी केली आहे.

गावातील हुशार ,गरीब व अनाथ विद्यार्थ्यांना मदत करण्याचे आश्वासन

# उमेद फाउंडेशन कडून सैनिक टाकळीमध्ये मोफत शैक्षणिक मदत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सैनिक टाकळी प्रतिनिधी/संजय चव्हाण : उमेद फाउंडेशन यांच्यामार्फत दरवर्षी गरजू व आर्थिक दृष्ट्या असक्षम असलेल्या विद्यार्थ्यांना मदत म्हणून शैक्षणिक साहित्य महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये पुरवले जाते.

यावर्षी १५ जून रोजी महाराष्ट्रातील शाळा सुरू होण्याच्या अनुषंगाने उमेद फाउंडेशन तर्फे अगोदरच गरजू मुलांना हे शैक्षणिक किट पुरवण्यात आले.

सैनिक टाकळी मध्ये उमेद फाउंडेशन कोल्हापूर विभागाचे सदस्य सुदर्शन पाटील यांच्या सहकार्यातून १० शैक्षणिक किट पुरवण्यात आली.

यामध्ये कुमार विद्यामंदिर, कन्या विद्या मंदिर ,छत्रपती संभाजीनगर शाळा, छत्रपती शिवाजी हायस्कूल व गर्ल्स हायस्कूल सैनिक टाकळी येथील गरजू विद्यार्थ्यांना याचा लाभ झाला.

या शैक्षणिक किटमध्ये सॅक, पाणी बॉटल ,हात रुमाल, इयत्तेप्रमाणे लागणाऱ्या वह्या,पेन, कंपास ,रबर, पेन्सिल, चित्रकला वही, यासह इतरही




साहित्य उपलब्ध आहे.

उमेद फाउंडेशन ही संस्था गेल्या कित्येक वर्षापासून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी संपूर्ण राज्यभर कार्य करत आहे. यांचे वेगवेगळे उपक्रम महाराष्ट्र राज्यामध्ये शैक्षणिक व सामाजिक जडणघडणीमध्ये मोलाचे ठरत आहेत.

या फाउंडेशन तर्फे उमेद मायेचे घर या सामाजिक प्रकल्पा अंतर्गत समाजातील गरीब ,गरजू व अनाथ मुलांच्यासाठी देखील मोफत शिक्षण, राहणे ,जेवण या सुविधासहित वसतिगृह सांगरूळ रोड कोपार्डे येथे उपलब्ध आहे.

सैनिक टाकळी मधील १० अत्यंत गरीब व गरजू मुलांना मदत मिळाल्यामुळे उमेद फाउंडेशन कोल्हापूर विभागाचे सदस्य सैनिक टाकळी चे सुदर्शन पाटील यांचे सगळीकडे कौतुक होत आहे.

हे शैक्षणिक किट वाटपावेळी शाळेतील मुख्याध्यापक , शिक्षक , इतर स्टाफ व उमेद फाउंडेशन चे सुदर्शन पाटील उपस्थित होते.

या सर्व मदत प्रसंगी उमेद फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश गाताडे सर, शैक्षणिक पालकत्व मोहीम प्रमुख प्रदीप नाळे सर,तसेच सागर कासोटे सर व कोल्हापूर विभागाचे सदस्य गौतम जिरगे सर यांची देखील मोलाची मदत मिळाली. यावेळी बोलताना सुदर्शन पाटील यांनी कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी उमेद फाउंडेशन कार्य करत असून यापुढील काळात देखील गावातील हुशार ,गरीब व अनाथ विद्यार्थ्यांना मदत करण्याचे आश्वासन दिले. शेवटी सर्व शाळांच्या वतीने उमेद फाउंडेशन चे व सुदर्शन पाटील यांचे आभार मानून त्यांचा सत्कार करण्यात आला.

# कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचा नवा उत्साह




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/अक्कलकोट : महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालयात सोमवार दिनांक १५ जून २०२६ रोजी शाळेचा पहिला दिवस म्हणून संस्थेचे संस्थापक कै. पंचप्पा कल्याणशेट्टी व शिक्षणाची जननी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक मराठी, कन्नड व सेमी इंग्रजी माध्यमाच्या सर्व मुलांना संचालिका सौ शांभवी कल्याणशेट्टी, संस्थेच्या शिक्षण विभाग प्रमुख सौ रूपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख सौ पूनम कोकळगी यांनी औक्षण केले. त्यानंतर गुलाबपुष्प व चिक्की, चॉकलेट देऊन सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.

तद्नंतर विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहात व आनंदात शाळेत प्रवेश केला. यावेळी शासनाकडून आलेले पाठ्यपुस्तक सर्व विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.

यावेळी संस्थेचे संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, सेमी विभाग प्रमुख दिगंबर जगताप आदी मराठी, कन्नड, सेमी विभागाचे सर्व शिक्षक उपस्थित होते.

शाळेचा पहिला दिवस म्हणून संपूर्ण शाळा सजवले होते. गेटवर सुंदर रांगोळी, दर्शनी भागात रंगीबेरंगी फुगे लावले होते. सेल्फी पॉईंट मधून विद्यार्थी फोटो काढत होते, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह व आनंद दिसून आला.